# शैक्षणिक प्रक्रियांद्वारे प्रभावी वर्गप्रक्रियेसाठी शिक्षण यंत्रणा सक्षम बनवणे

शिक्षक आपल्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याकडून अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी त्यांच्या वर्गात उत्कृष्ट अध्यापन कौशाल्याद्वारे प्रयत्न करत असतात. परंतु अनेक वेळा त्यांना विद्यार्थ्यांसोबत काम करताना सुलभक म्हणून अनेक अडचणी येत असतात. स्थानिक प्रश्न, अतिरिक्त कामे, स्वत:ची शैक्षणिक समज, स्थानिक भाषा, पालकांचे – स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहकार्य, अशा अनेक पातळीवर त्यांना सामना करावा लागतो. त्यांच्या परीने ते प्रयत्न करत असतातच, पण तरीही त्यांना अधिकाऱ्यांच्या तसेच शिक्षण तज्ञांच्या मदतीची आवश्यकता असते.

सातार्‍यात, ग्यान प्रकाश फाउंडेशन, DIET आणि शिक्षण व्यवस्थेसोबत शिक्षकांना बळकट करण्यासाठी काम करत आहे, जेणेकरून वर्ग प्रक्रिया सक्शन होऊन विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित शैक्षणिक अब्दल दिसून येतील. यासाठी केंद्र आणि तालुका स्तरावरील यंत्रणा शिक्षकांना शैक्षणिक आधार देण्यासाठी सक्षम असावी. तालुका स्तरावरील मासिक बैठका तसेच केंद्र स्तरावरील शिक्षण परिषदा नियमित आणि परिणाम कारक होण्यासाठी ग्यान प्रकाश फौंडेशन प्रयत्न करत आहेच. याशिवाय विविध कार्यशाळा आयोजित करण्यासाठी संस्था प्रयत्न करते.

**शिक्षण विभाग, पंचायत समिती महाबळेश्वर**
**ई-मेल आयडी :- beomshwar@gmail.com**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**सुधारित आदेश**

जा.क्र.पंसम/शिक्षण/आस्था-१/ /२३
दि. ०३.०३.२०२३

प्रति,

श्री./श्रीम. -------------------------, जि.प. प्राथ. शाळा ------------- ता. महाबळेश्वर जि. सातारा

**विषय :- केंद्रसंचालक म्हणून कामकाज करणेबाबत**

संदर्भ :- १. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.
३. मा. शिक्षणाधिकारी(प्राथ.), सातारा जिल्हा परिषद, सातारा व मा. प्राचार्य, शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण जि. सातारा यांचेकडील सूचना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, महाबळेश्वर तालुक्यातील विविध व्यवस्थापनाच्या १७७ शाळा असून सदरच्या शाळांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणेसाठी पर्यवेक्षिय यंत्रणेतील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शाळांचे संनियत्रण करणे अडचणींचे होत आहे.

तरी सदर वस्तूस्थिती अवलोकन करता खालील नमूद शिक्षकांची त्यांची मूळ आस्थापनेवरील कामकाज सांभाळून केंद्रसंचालक म्हणून पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात कामकाज करणेसाठी निवड करणेत आली आहे. तरी आपण आपल्या शाळेचे अध्ययन-अध्यापन कामकाजावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेऊन केंद्राच्या माहित्यांचे संकलन करुन केंद्र व तालुका यांच्यामध्ये अदान-प्रदान करणे, शाळांची शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा वाढविणेसाठी शाळांमधील शिक्षकांना मार्गदर्शन करणे अशा स्वरुपाची कामे आपल्या केंद्राचे अतिरिक्त पदभार असलेल्या केंद्रप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली करावयाची आहेत. या कामकाजामुळे आपल्या शाळेतून अगर गावातून कोणतीही तक्रार होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. तसेच या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांची प्रभावीपणे कार्यवाही करावी.

| अ.क्र. | शिक्षकांचे नाव | शाळा | केंद्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. संजय सखराम पार्टे | जि.प. प्राथ. शाळा खिंगर | खिंगर | |
| २ | श्री. विनोद रमेश कुमठेकर | जि.प. प्राथ. शाळा आकल्पे | लामज | |
| ३ | श्री. विकास दिलीप आवळे | जि.प. प्राथ. शाळा आवळण | वाळणे | |
| ४ | श्री. संजय शंकर सोंडकर | जि.प. प्राथ. शाळा माचूतर | माचूतर | |
| ५ | श्री. चंद्रकांत कृष्णा जंगम | जि.प. प्राथ. शाळा तापोळा | वेळापूर | |
| ६ | श्री. संजय धोंडिबा सकपाळ | जि.प. प्राथ. शाळा वेंगळेवरचीवाडी | येरणे बु | |
| ७ | श्री. विजय सुदाम भोसले | जि.प. प्राथ. शाळा भिलार | भिलार | |
| ८ | श्री. राजू किसन संकपाळ | जि.प. प्राथ. शाळा क्षेत्रमहाबळेश्वर | मेटगुताड | |
| ९ | श्री. अरुण विठ्ठल कदम | जि.प. प्राथ. शाळा कळमगांवमुरा | मांघर | |
| १० | श्री. जयराज अंकुश जाधव | जि.प. प्राथ. शाळा नवेनगर | पारसोंड | |
| ११ | श्री. अमोल आबाजी जगताप | जि.प. प्राथ. शाळा शिरवली | शिरवली | |
| १२ | श्री. अनिल गुलाब गोळे | जि.प. प्राथ. शाळा दाभेमोहन | खरोशी | |
| १३ | श्री. संतोष तुळशीराम शिंदे | गि.न.प.प्रथ. शाळा नं २, महाबळेश्वर | महाबळेश्वर शहर | |
| १४ | श्री. लक्ष्मण भैरु हिरवे | न.प. प्राथ. शाळा नं २, पाचगणी | पाचगणी शहर | |

प्रत - कार्यवाहीस्तव रवाना
१. केंद्रप्रमुख, केंद्रशाळा ------------------------ ता. महाबळेश्वर
२. मुख्याध्यापक, जि.प. प्राथ. शाळा ------------------- ता. महाबळेश्वर

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
१. मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, सातारा
२. मा. गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती महाबळेश्वर

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती महाबळेश्वर

केंद्र आणि तालुकास्तरीय प्रक्रियेतील महत्वाचे विषय, माहिती शिक्षकांपर्यंत पोहोचवताना केंद्रप्रमुख आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असते. हे साध्य करण्यासाठी ग्यानप्रकाश फाउंडेशनने केंद्र आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी क्षमता-आधारित शिक्षणावर कार्यशाळा आयोजित केल्या.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात ही कार्यशाळा घेतली असता, केंद्र प्रमुखांची अनेक पदे रिक्त असल्याचे दिसून आले. शिक्षण परिषदा आणि केंद्र संसाधन गट यांच्या बैठका यांसारख्या केंद्र स्तरावरील प्रक्रियांच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत होता.


या कार्यशाळेनंतर ग्यानप्रकाश फाउंडेशनने गटशिक्षणाधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्याशी झालेल्या बैठकीत या

प्विषयावर चर्चा केली. दोन्ही अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित जिल्हा अधिकाऱ्यांशी चर्चा करून यावर मार्ग काढू असे आश्वासन दिले.

एका आठवड्याच्या आत प्रत्येक केंद्रामधील एका ज्येष्ठ आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम शिक्षकाला त्याच्या केंद्रातील शिक्षकांना मदत करण्यासाठी अतिरिक्त जबाबदारी दिली जाईल असे ठरविण्यात आले आणि तसा एक औपचारिक आदेश गटशिक्षणाधिकारी यांनी जारी केला. त्यांना केंद्रसंचालक म्हणून नवीन नामकरणही केले गेले.

ग्यानप्रकाश फाऊंडेशनच्या वाटचालीतील ही एक मोठी घटना होती.  आता हे सर्व 'केंद्र संचालक " इतर शिक्षकांना त्यांच्या कामात सहकार्य करत आहेत. यामुळे येथील केंद्र स्तरावरील शिक्षण परिषदा, केंद्र संसाधन गटाच्या बैठकी, शाळा स्तरावरील पालक बैठका, नियमित आणि परिणामकारक होतील, आणि पर्यायाने वर्गप्रक्रीया सक्षम व्हायला मदत करतील.





दिनांक: मार्च २०२३
: ग्यान प्रकाश फाउंडेशन
2016 पासून एडेलगिव्ह फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग  एज्युकेशन (CTE) प्रोग्राममध्ये शिकलेल्या गोष्टींवर आधारित आहे.